"नाशिक आणि नांदेड जिल्ह्यातील अनुसूचितजमातींच्या आर्थिक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास"

संशोधन आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या वाणिज्य विद्याशाखे अंतर्गत वाणिज्य विषयातील विद्यावाचस्पती पदवीसाठी सादर करावयाचा पूर्व संशोधन आराखडा

संशोधक

प्रा. कर्डक सुनील भास्कर

एम.कॉम.;बी.एड.;सेट ;जी .डी.सी.ए.;एम.ए.(अर्थ.)

गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय ,सिन्नर, जि.नाशिक.

मार्गदर्शक

डॉ .बी .एस.पवार

एम.कॉम. एम. फिल.पीएच.डी.

माधवराव पाटील कॉलेज, पालम,जि.नांदेड

मे 2019

❖ प्रस्तावना:

जगात जवळपास सर्वच देशांमध्ये आदिवासी जमाती वास्तव्यास आहेत. भारतामध्ये अनुसूचित जमातींचे प्रमाण 8.6 टक्के इतके आहे. यापैकी फक्त 2.4 टक्के अनुसूचित जमाती शहरी भागात राहतात व उर्वरित ग्रामीण पहाडी व जंगली भागात राहतात.भारतात मध्य प्रदेश, महाराष्ट्र, ओरिसा, गुजरात, राजस्थान, झारखंड, छत्तीसगढ, आंध्रप्रदेश, पश्चिम बंगाल आणि कर्नाटकामध्ये एकूण आदिवासी जमातीच्या 83.2 टक्के लोकसंख्या राहते.तर आसाम, मेघालय, नागालँड, बिहार, मनिपुर, अरुणाचल प्रदेश, जम्मू काश्मीर, त्रिपुरा, मिझोराम, तामिळनाडू या राज्यांमध्ये 15.3 टक्के अनुसूचित जमाती राहतात.

2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रामध्ये 1123.74 लाख इतकी एकूण लोकसंख्या होती.त्यापैकी 105.10 लाख लोकसंख्या अनुसूचित जमातीची होती.ही महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येच्या 9.35 टक्के इतकी आहे. महाराष्ट्रात एकूण 35 जिल्हे आहेत.त्यापैकी धुळे,नंदुरबार ,जळगाव, नाशिक व ठाणे ,पालघर हे जिल्हे डोंगरी जिल्हे म्हणून ओळखले जातात. तर चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर, अमरावती व यवतमाळ हे जिल्हे जंगली जिल्हे म्हणून ओळखले जातात.या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनुसूचितजमातींची संख्या आढळून येते.

नाशिक जिल्ह्यात 2011 च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या 6107 हजार इतकी होती.त्यापैकी 1564389 लोकसंख्या ही अनुसूचित जमातीची होती. यामध्ये 7,92 ,547 इतके पुरुष होते तर स्त्रियांची संख्या 7,71,822 इतकी होती.नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, नाशिक, पेठ, सुरगाना, कळवण, बागलान व दिंडोरी हे तालुके आदिवासी तालुके म्हणून ओळखले जातात. या तालुक्यांमध्ये भिल्ल, भिल, गरसिया, कोकणा, कोकणी, कुकणा, कोळी, महादेव कोळी ,धनगर कोळी, ठाकूर, ठाकर ,वारली इत्यादी अनुसूचितजमाती राहतात.

नांदेड जिल्ह्यात 2011 च्या जनगणनेनुसार 33,61,292 इतकी एकूण लोकसंख्या होती.या लोकसंख्येमध्ये अनुसूचित जमातीची लोकसंख्या 281695 इतकी होती. यामध्ये पुरुषांची लोकसंख्या 1,43,892 तर स्त्रियांची लोकसंख्या 1,37,803 इतकी होती.हे प्रमाण नांदेड जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या 8.38 टक्के इतके आहे. नांदेड जिल्ह्यात एकूण सोळा तालुके आहेत या प्रत्येक तालुक्यामध्ये अनुसूचित जमातींची लोकसंख्या आहे.नांदेड जिल्ह्यात प्रामुख्याने सात अनुसूचित जमाती आढळतात, यामध्ये अंधा, गोंड, भिल्ल, कोलाम, परधान, थोटी आणि कोया या जमाती आढळून येतात.या जमातीतील बहुसंख्य लोकांचा शेती करणे हा मुख्य व्यवसाय आहे.तसेच

शेतमजुरी ,शिकार ,वनस्पती गोळा करणे, बांबूपासूनटोपल्या बनविणे, चटया बनविणे, दोरखंड बनविणे, महुआ, लाख, डिंक, सरपन गोळा करणे, हिरडा, बेहडा, तेंदूपत्ता, मध, चारोळी, कंदमुळे गोळा करणे, हस्तकलेचे व्यवसाय, कोळसा पाडणे, मासेमारी करणे यासारखे व्यवसाय अनुसूचित जमाती कडून केले जातात.या अनुसूचितजमातीच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाचा आदिवासी विभाग कार्यरत आहे. या विभागामार्फत, तसेच शासनामार्फत आदिवासींच्या विकासासाठी काही महत्त्वपूर्ण योजना राबविल्या जातात. या योजनांचा फायदा अनुसूचित जमातीतील काही लोकांना झालेला आहे.असे असले तरी त्यांची आर्थिक स्थिती तितकीशी बळकट नाही त्यांना अनेक समस्या आहेत.

अनुसूचितजमाती ह्या प्रामुख्याने डोंगरी आणि जंगली भागाच्या जवळपास राहत असल्याने, त्यांचा प्रमुख व्यवसाय शेती करणे हा आहे .तसेच शेतीही पावसाच्या पाण्यावर अवलंबूनअसल्याने ती बारमाही नाही. शेती प्रामुख्याने भात, नाचणी, वरई यासारखी पावसाळयात येणारी पिके घेतली जातात.तसेच बाजरी, गहू, मठ, करडई, खुरसनी, तीळ ही पिके देखील घेतली जातात.ज्या आदिवासी तालुक्यांमध्ये पाण्यासाठी धरणाची व्यवस्था आहे अशा काही ठिकाणी नगदी पिके देखील घेतली जातात. यामध्ये टोमॅटो, वालवड, वाटाणा, वांगी, हिरवी मिरची, पालेभाज्या यासारख्या पिकांचा समावेश होतो.असे असले तरी या नगदी पिकांचे प्रमाण वित्तीय गरजे अभावी कमी असते.ज्या शेतकऱ्यांकडे भांडवल असते तेच शक्यतो मोठ्या खर्चाची नगदी पिके घेऊ शकतात.परंतु वित्तीय समस्या असणाऱ्या अनुसूचितजमातीतील लोकांना पारंपरिक शेतीच करावी लागते. त्यामुळे शेतीपासून मिळणारे उत्पन्न तुलनेत कमी असते. शेतीबरोबरच मासेमारी, शेळया-मेंढ्या पाळणे ,कोंबड्या, जनावरे यासारखे व्यवसाय देखील केले जातात .त्याचबरोबर जंगलातील वनस्पती पासून मिळणारी फळे, कंदमुळे, जंगली भाज्या, लाकडाच्या मोळया विकणे यासारखे छोटे- मोठे व्यवसाय करुन उपजीविका चालवली जाते. तसेच इतर बागायती भागात जाऊन शेतीची कामे करून उपजीविका चालवली जाते या सर्व कार्यातून उपजीविका चालवताना अनेक वित्तीय समस्या अनुसूचित जमातीच्या लोकांना निर्माण होतात. यामध्ये भांडवलाचा अभाव, मजुरांची समस्या, वाहतूक, बाजारपेठेच्या सोई, खते व बी बियाणे, कृषी उपकरणे व यंत्रे, पाणीपुरवठा यासारख्या अनेक वित्तीय समस्यांना तोंड द्यावे लागते. या कारणामुळे अनुसूचित जमातींची आर्थिक स्थिती तितकीशी चांगली नाही. म्हणूनच नाशिक आणि नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या आर्थिक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न संबंधितसंशोधनातूनकेला जाणार आहे.

भारतात जवळपास 427 आदिवासी जमाती असून भौगोलिक आधारावर आदिवासींचे विभाजन झाले आहे. उत्तर-पूर्व भारत, मध्य भारत ,दक्षिण भारत ,पश्चिम भारत व महाराष्ट्रात जवळपास

47 प्रकारच्या अनुसूचित जमाती आहे. 2011च्या जनगणनेनुसार भारतात आदिवासी समाजाची लोकसंख्या 8.6 टक्के एवढे आहे .तर महाराष्ट्रात हेच प्रमाण 9.35 टक्के एवढे आहे. तर नाशिक जिल्ह्यात इगतपुरी, नाशिक, त्र्यंबकेश्वर, दिंडोरी, पेठ, सुरगाणा, कळवण, बागलाण या तालुक्यांमध्ये अनुसूचित जमातींची संख्या अधिक आहे. तर नांदेड जिल्ह्यातील एकूण सोळा तालुक्यांपैकी बहुसंख्य तालुक्यात अनुसूचित जमातींची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे.अनुसूचित जमातीतील लोकांचा मुख्य व्यवसाय, त्यांची जीवनशैली यामध्ये मोठ्या प्रमाणावर विविधता आढळून येते .आदिवासी जमातींसाठी आदिवासी ऐवजी अनुसूचित जमाती असा शब्दप्रयोग कायद्यात वापरला जातो. अनुसूचित जमातीतील लोकांचे आर्थिक व्यवहार, त्यांच्या गरजा, शिक्षणाचे प्रमाण, नोकरी-व्यवसायात असलेल्यांची संख्या व उदरनिर्वाह यासारख्या बाबी महत्त्वपूर्ण आहेत. भारतीय राज्यघटनेच्या कलम 342,,(1) ***अनुसार 'राष्ट्रपतींनी घोषित केलेल्या जमातींना अनुसूचित जमाती असे म्हटले जाते'***.अनुसूचित जमातीमध्ये भिल्ल, महादेव कोळी, गोंड, वारली, कोकणी, ठाकर, गावित, कोरकू, मल्हार कोळी धोंड्या, दुबळा या जमातींचा प्रामुख्याने समावेश होतो. या जमातींची वैशिष्ट्ये आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, मागासलेपणा, विशिष्ट भौगोलिक प्रदेश, अंतर्विवाही, स्वतंत्र पंचायत, श्रमविभागणी, रूढी परंपरा, निसर्ग पूजा, जादूटोणा यावर विश्वास ही सांगता येतील.

वरील वैशिष्ट्यांचा विचार करता, अनुसूचित जमाती या मागास आहेत.त्यामुळे त्यांचा विकास झालेला नाही.त्यांना अनेक समस्यांचा सामना दैनंदिन जीवन जगत असताना करावा लागतो. या जमातींसाठी शासनाने विविध योजना व उपक्रम राबवून त्यांचा विकास करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. परंतु फारच थोड्या लोकांपर्यंत या योजना पोहोचल्यामुळे त्यांचे मागासलेपण आणि समस्या कमी झाल्याचे आजही दिसत नाही.त्या संबंधित माहिती मिळवण्यासाठी संबंधित संशोधनामध्ये नाशिक आणि नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जमातींच्या आर्थिक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास या विषयाची संशोधनासाठी निवड करण्यात आली आहे.

❖ संशोधन विधान:

"नाशिक आणि नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या आर्थिक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास"

❖ संशोधन साहित्याचा आढावा व संशोधन विकास:

१) नाशिक जिल्ह्यातील अनुसूचित जमातींच्या भौगोलिक दृष्टिकोनातून असणाऱ्या समस्यांचा अभ्यास श्री. कुदनर सी. के. यांनी आपल्या संशोधनातून केला आहे .त्यामध्ये त्यांनी आदिवासी समाजाच्या सामाजिक व भौगोलिक समस्यांचा अभ्यास केला आहे.

2) शोध गंगा वरील नांदेड जिल्ह्याची पार्श्वभूमी आणि आदिवासी समाज या प्रकरणांमध्ये नांदेड जिल्ह्यातील आदिवासी जमाती त्यांचे व्यवसाय, जीवनमान याविषयी माहिती देण्यात आली आहे.

3) तसेच मार्च 2018 मध्ये प्रकाशित झालेल्या रिसर्च जर्नी या जर्नलमध्ये वेगवेगळया संशोधकांनी आदिवासी संस्कृती विवाह पद्धति, व्यवसाय, जीवनशैली, राजकीय सहभाग, आदिवासी चळवळ, शिक्षण, कायदा ,आर्थिक विकास याविषयी शोध निबंध प्रकाशित केले आहे.परंतु अनुसूचित जमातीतील जमातीचे आर्थिक स्थिती संबंधात तुलनात्मक संशोधन झालेले नाही.यासाठी नाशिक आणि नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जातीच्या आर्थिक स्थितीचा तुलनात्मक अभ्यास करणे गरजेचे वाटते म्हणून संबंधित विषयाची निवड केली आहे.

❖ संशोधन विषयाचे महत्त्व :

आंतरराष्ट्रीय:

जगातील जरूर जवळजवळ सर्व देशांमध्ये अनुसूचित जमाती आदिवासी समाज आढळून येतो.या समाजातील लोकांचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, विकास पाहिजे तितका झालेला नाही. या लोकांसाठी सरकार मार्फत योजना राबविल्या जातात .या योजनांचा लाभ सर्वच पातळीवर होणे शक्य नाही.काही मर्यादित लोकांपर्यंत या योजना पोहोचल्या जातात व त्यांनाच या योजनांचा लाभ होतो .परंतु या जमातीतील बहुसंख्य लोक या योजनांच्या लाभापासून वंचित राहतात.

राष्ट्रीय-

भारतात एकूण लोकसंख्येच्या 8.6 टक्के लोकसंख्या ही अनुसूचित जमातीचे आहे .भारतात एकूण 427 अनुसूचित जमाती आहे.तर महाराष्ट्रात 47 अनुसूचित जमाती राहतात.या जमाती डोंगरी व जंगल प्रदेशात राहतात. त्यामुळे त्यांच्यापर्यंत विविध सोयीसुविधा ,कल्याणकारी योजना पोहोचू शकत नाही.म्हणून संबंधित संशोधन करणे गरजेचे आहे.

प्रादेशिक -

नाशिक जिल्ह्याचा विचार करता 7 तालुक्यांमध्ये अनुसूचित जमाती जास्त प्रमाणात राहतात .म्हणून या तालुक्यांना आदिवासी तालुके म्हणून घोषित करण्यात आले आहे. या तालुक्यांमध्ये भील, भिल्ल ,कोळी, महादेव कोळी ,कोकणा-कोकणी, कोकणी, ठाकूर, ठाकूर ,वारली या अनुसूचित जमाती राहतात . तर नांदेड जिल्ह्यात एकूण सोळा तालुक्यात कमी-अधिक प्रमाणात अनुसूचित जमातींचे वास्तव्य आहे. नांदेड जिल्ह्यात एकूण सात आदिवासी जमाती राहतात.या जमातीपैकी काही जमातींचा प्रमुख व्यवसाय शेती करणे हा आहे.या आदिवासी तालुक्यांमध्ये डोंगरी व पहाडी भागात पावसाळ्यात पावसाचे प्रमाण जास्त असते.म्हणून या ठिकाणी भात शेती केली जाते.तसेच काही आदिवासी जमातींचा व्यवसाय मासेमारी करणे हा देखील आहे.उपजीविका चालविण्यासाठी शेतमजुरी ,लाकूडतोड, कंदमुळे विकणे ,जंगली भाज्या, यासारखे छोटे मोठे व्यवसाय केले जातात.या व्यवसायापासून मिळणारे उत्पन्न तुलनेने फार कमी आहे.ज्यातून उपजीविका चालविणे शक्य नाही.शासनामार्फत आदिवासी विकास योजना राबविल्या जातात .या योजनांचा लाभ फारच थोड्या अनुसूचितजमाती पर्यंत पोहोचतो ,तर काही लोक यापासून वंचित राहतात.या जमातींना आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी अनेक समस्यांना सामोरे जावे लागते .म्हणून या या जमातींच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन होणे गरजेचे आहे.यासाठी संबंधित संशोधन केले जाणार आहे.

व्याप्ती आणि मर्यादा:

संबंधित संशोधनासाठी नाशिक आणि नांदेड जिल्ह्यातील आदिवासी तालुके निवडण्यात आलेले आहेत .या संशोधनात आदिवासींच्या गरजा, व्यवसाय, जीवनशैली, शिक्षण, वित्तीय स्रोत, वित्तीय समस्या, आर्थिक स्थिती यांचा समावेश करण्यात आला आहे.

1) हे संशोधन केवळ नाशिक आणि नांदेड जिल्हा आणि त्यातील आदिवासी तालुके यापुरते मर्यादित आहे..

2) संशोधनासाठी नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात येणार असल्याने संशोधनाची मर्यादा वाढू शकते.
3) संशोधन केवळ नाशिक आणि नांदेड जिल्ह्यातील आदिवासी तालुक्यात पुरते मर्यादित असल्याने इतर ठिकाणी त्याचे निष्कर्ष लागू पडतीलच असे नाही.

❖ संशोधनाची उद्दिष्टे:

1) नाशिक आणि नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जमातीत समाविष्ट घटकांचा अभ्यास करणे
2) नाशिक आणि नांदेड जिल्ह्यातील अनुसूचितजमातींच्या शिक्षण ,व्यवसाय व जीवन शैलीचा अभ्यास करणे.
3) नाशिक आणि नांदेड जिल्ह्यातील अनुसूचितजमातींसाठी असणाऱ्या शासनाच्या विविध योजनांचा अभ्यास करणे.
4) नाशिक आणि नांदेड जिल्ह्यातील अनुसूचितजमातीच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

❖ संशोधनाची गृहितके:

1) अनुसूचित जमातीच्यागरजा मर्यादित असतात.
2) मर्यादित वित्तीय स्त्रोतांचा वापर करून आर्थिक गरजा भागविण्याचा प्रयत्न अनुसूचितजमातीकडून केला जातो.
3) उत्पादनाची साधने मर्यादित असल्याने अनुसूचितजमातीतील लोकांना वित्तीय समस्यांचा सामना करावा लागतो.
4) स्वतःच्या व्यवसायातील उत्पन्न कमी असल्याने अनुसूचितजमातीतील लोकांना इतर घटकांवर अवलंबूनराहावे लागते.

❖ संशोधन पद्धती:

संबंधितसंशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर करून माहिती संकलित करण्याचा प्रयत्न केला आहे .

✓ **.प्राथमिक साधने -**

प्राथमिक साधनांत प्रत्यक्ष भेट ,सर्वेक्षण आणि प्रश्नावली पद्धतीचा वापर करून माहिती मिळवली जाणार आहे. तसेच नाशिक जिल्ह्यातील ७ आदिवासी तालुक्यातील प्रत्येकी ५ गावांची व नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यांतील प्रत्येकी ५ गावाची निवड करून प्रत्येक गावातून ५ नमुने निवडून एकूण ५५० नमुने माहिती संकलनासाठी वापरलेजाणार आहे.

✓ **.दुय्यमसाधने -**

दुय्यम साधनांमध्ये इंटरनेट ,संदर्भ ग्रंथ ,पुस्तके ,मासिके, संशोधन विषयाशी संबंधित पुस्तके, वर्तमानपत्र, यांचा वापर करून माहिती मिळवून संशोधन केले पूर्ण केले जाणार आहे.

संशोधनाचा कालखंड:

संबंधित संशोधनासाठी2016-17 ते 2018-19 या कालखंडाची निवड करण्यात आली आहे.

❖ **प्रकरणांची रचना-**

✓ **प्रकरण -1:** प्रस्तावना

✓ **प्रकरण-2:**संशोधन पद्धती

✓ **प्रकरण-3:**नाशिक आणि नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जमातीचे सामाजिक, शैक्षणिक व व्यावसायिक अध्ययन.

✓ **प्रकरण-4:**नाशिक आणि नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जमातींसाठी असणाऱ्या शासनाच्या विविध योजनांचे अध्ययन.

✓ **प्रकरण-5:**नाशिक आणि नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन

✓ **प्रकरण-6:**निष्कर्ष आणि शिफारशी

✓ **संदर्भसूची:**

✓ **परिशिष्ट:**

❖ **संदर्भसूची:-**

. आदिवासी समाजशास्त्र, डॉ संजय साळुंखे

. आदिवासी नेतृत्व डॉक्टर प्रल्हाद दुधाने शोध निबंध रिसर्च जर्नी मार्च 2018

. मानवी साधन संपत्ती भूगोलएस बी सवदी निराली प्रकाशन 2009

. Problems and prospects of tribal population, Prof. C. K. Kudnar

. Research journey, March 2018 swatidhan publication.

.www.shodhganga.com

प्रा.सुनील भास्कर कर्डक

संशोधक

डॉ.बी .एस .पवार

मार्गदर्शक